● मंगळवार, दि. ३१ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १५३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## व्यापाऱ्यास लुटणारे पाच जणांना पोलीसांनी केले जेरबंद

### साडेसहा लाखांचा मुद्देमाल जप्त; जालना पोलीसांना वाळुज पोलीसांची मदत

**जालना । प्रतिनिधी -** शहरात व्यापाऱ्यास लुटून बारा लाखांची रोकड लंपास करणाऱ्या पाच जणांना पोलीसांनी जेरबंद केले आहे. शुक्रवार (दि २७) रोजी ९:१५ वाजेच्या सुमारास अज्ञात आरोपीतांनी फिर्यादी नामे घनशाम भगतराम अग्रवाल, वय-६० वर्ष, रा. संभाजीनगर, जालना यांना जुना मोंडा परिसरातील गुरुमुख होजीअरी कापड दुकानाच्या समोरील गल्लीमध्ये मारहाण करुन त्यांच्या ताब्यातील रु.१२,५०,०००/- रुपये हिसकावून घेवून गेल्याची घटना घडली होती. सदर बाजार पोलीस ठाण्यात यासंबंधी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेनंतर पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी घटनास्थळी भेट देवून गुन्हा उघडकीस आणणेबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, व सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने दोन पथके स्थापन करण्यात आली. गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरची जबरी चोरी ही मान देऊळगाव, ता.जि. जालना येथील गोपाल गणेश गायकवाड, वय-२० वर्ष, रा. मानदेऊळगांव, जालना व सुनिल महादू पवार, वय-२१ वर्ष, रा.मानदेऊळगांव, जालना यांनी त्यांच्या साथीदारांच्या मदतीने केली आहे.

दिनांक २९/१२/२०२४ रोजी तांत्रीक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे गोपाल गणेश गायकवाड, वय-२० वर्ष, रा.मानदेऊळगांव, जालना व सुनिल महादु पवार, वय-२१ वर्ष, रा. मानदेऊळगांव, जालना याचा शोध घेत असतांना ते गोवा येथे ३१ डिसेंबर साजरा करण्यासाठी जात असल्याची माहिती मिळाली व ते राजुर-भोकरदन रोडने क्रुझर गाडीने जात असल्याचे दिसुन आल्याने त्यांचा पाठलाग करुन अत्यंत शिताफीने ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या



अनुषंगाने विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानुसार त्यांच्याकडुन जबरी चोरी झालेल्या रोख रक्कमेपैकी रु.५,००,०५०/- रोख रक्कम व सोन्याचे दागिने, रु.१,१०,०००/- किंमतीची एक गुन्हयात वापरलेली मोटार सायकल, रु.२०,०००/- किंमतीचे आरोपीतांचे दोन मोबाईल असा एकूण रु.६.३०,०५०/- रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे व सदर गुन्हयाचा पुढील तपास सदर बाजार पोउपनि दिपाली शिंदे हया करीत आहेत.

त्यानंतर उर्वरित फरार आरोपी हे छत्रपती संभाजीनगर येथे गेल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत मिळाल्याने त्यांचा एम.आय.डी.सी. वाळूज पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर यांच्या मदतीने आरोपी नामे ०१) सुमित ऊर्फ ओम शैलेश डुरे, वय-१९ वर्षे, रा. कसबा जुना जालना २) कैलास ऊर्फ कॉलेज राजु गायकवाड, वय-२३ वर्षे, रा.कैकाडी मोहल्ला जुना जालना ३) सचिन ऊर्फ माया हरीचंद्र जाधव, यय-१९ वर्षे, रा.कैकाडी मोहल्ला जुना जालना यांना ताब्यत घेण्यात आले.

तसेच नमुद आरोपीतांना अधिक विश्वासात घेउन विचारपुस करता दिनांक २१/१२/२०२४ रोजी जाफ्राबाद ते टेंभुर्णी रोडवरी वेअर हाउस जवळ वरील पाच आरोपी व त्यांचा एक साथीदार यांनी मिळून जबरी चोरीचा गुन्हा केलेला आहे अशी कबुली दिली. सदर गुन्हयाबाबत माहिती घेतली असता पोलीस ठाणे टेम्भुणी येथे गु.र.न.२६३/२०२४ कलम-३०९(६), ३(५) भा.न्या.सं.प्रमाणे दाखल आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पान २ वर

## आरटीओच्या ई प्रणाली नियमाच्या धोरणामुळे रुग्णवाहिका सेवा अडचणीत

**पनवेल । प्रतिनिधी -** रुग्णवाहिका ही अत्य आवश्यक सेवेमध्ये मोडत असून त्याच्यावर वेग मर्यादाच नियंत्रण आणले आहे.आरटीओच्या ई प्रणाली नियमामुळे रुग्णवाहिकाच्या वेगाला लगाम लागणार आहे.या लगामामुळे रुग्णाचा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रुग्णांना नेताना रुग्ण सिरीयस कंडिशन होण्याचे किंवा मृत्यूचे प्रमाण वाढणार आहे.या घडणाऱ्या दुर्घटनेला आरटीओ प्रशासन जबाबदार राहील. त्याची नोंद प्रशासनाने घ्यावी. कारण पेशंट एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना रुग्णवाहिका वेग इ चलन दंड आकारत आहे. आरटीओ प्रशासनने रुग्णवाहीका साठी लागणारे इ चलन दंड बंद करण्यासाठी गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी महाशक्ती ऍम्ब्युलन्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य संघटनेने केली आहे. रुग्णवाहिकेला वेग मर्यादा लावल्याने रुग्ण हॉस्पिटला पोहोचायला उशीर होईल.त्या मुळे रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकतो. रुग्ण दगवू शकतो. त्यामुळे आम्ही रुग्णाच्या जीवाशी खेळू शकत नाही आम्ही रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी आमची जीवाची बाजी पणाला लावत असतो.वेग मर्यादेचा रुग्णवाहिकेला दंड आकरण्याच्या नियमाचा निषेध करतो.प्रशासनाने गांभीर्य लक्षात घेऊन जर निर्णय बदलला नाही तर भारतभर रुग्णवाहिकेचे चालक मालक रस्त्यावर उतरून रुग्ण सेवा भारतभर बंद करतील. याची दखल शासनाने व आरटीओ प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी मुकुंद कांबळे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष, महाशक्ती एम्ब्यूलन्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांनी केली आहे.




## जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा युवा पुरस्कार हा युवक कल्याण क्षेत्रात कार्य करणारे युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांच्या कार्याचे, योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे जिल्हा युवा पुरस्कार जिल्ह्यातील १ युवक व १ युवतींना रोख रक्कमेसह गौरवपत्र, सन्मानचिन्ह देण्यात येते. मागील तीन वर्षाच्या पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. तरी विहीत नमुन्यातील अर्जासह आपले प्रस्ताव आवश्यक कागदपत्रासह शुक्रवार दि.१० जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १८६० किंवा मुंबई पब्लिक ट्रॅस्ट क्ट १९५० नुसार पंजीबध्द असाव्यात. संस्थेसाठी रोख रक्कम, गौरवपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. वर्ष २०१९-२० च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २०१८ रोजी १३ वर्षे पान २ वर

## युवा आदर्श

### जुने नवे ...

जुने वर्षाची सांगता
निरोपिले कॅलेंडर
नवीन साल येताचं
जुने झाले सरेंडर
निरोप जुन्या देता
आले भले जीवावर
झाले गेले वर्ष तरी
असे तया नावावर
जगतात खरोखर
नसते काही स्थावर
सांगे सत्य कॅलेंडर
इथे सगळेचं नश्वर
कागदी ते कॅलेंडरं
बदलू शके बरोबर
आयुष्य मात्र वेगळे
कायम ते अगोचर
नव्याचे स्वागताला
चाले आवरा आवर
नवेही होणारं जुने
काळा भिन्न पॉवर
नवे जुने न् जुने नवे
खेळ चाले वरचे वर
सत्य जाणे खरोखर
काहीचं नसे स्थावर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मोसंबी मार्केट सात दिवस बंद

**जालना । प्रतिनिधी -** सध्या उत्तर भारतात थंडीची लाट आली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी बर्फवृष्टी देखील होत आहे. याचा थेट फटका जालन्यातील मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना बसतोय. उत्तर भारतात थंडी असल्यामुळे मोसंबीची मागणी घटल्याने मोसंबीला तीन रुपये किलो ते दहा रुपये किलो पर्यंतचा निश्वांकी दर मिळतो आहे. उत्तर भारतासह, कानपूर, बनारस या मार्केटमध्ये देखील जालन्याच्या मोसंबीला विक्रीसाठी अडचणी येत असल्याने आजपासून पुढील सात दिवस कृषी उत्पन्न बाजार समितीतील मोसंबी मार्केट बंद ठेवण्याचा निर्णय कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने घेतला आहे. दरम्यान या सात दिवसात शेतकऱ्यांनी मोसंबी विक्रीस आणू नये असे आवाहन देखील बाजार समिती प्रशासनाने केल आहे.



## सरपंच जयश्री गावडे यांची शासनाच्या राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत अभ्यास दौऱ्यासाठी निवड

### आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह भाटेपुरी येथील ग्रामस्थांकडून अभिनंदन व शुभेच्छा

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील ग्राम पंचायत भाटेपुरी च्या सरपंच जयश्री सतीश गावडे यांची महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्रिपुरा राज्याच्या अभ्यास दौऱ्यासाठी आदर्श सरपंच म्हणून निवड झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत दरवर्षी महाराष्ट्रातील आदर्श सरपंचांचा अभ्यास दौऱ्यासाठी समावेश करण्यात येत असतो. या वर्षीचा सरपंचांचा अभ्यास दौरा त्रिपुरा राज्यात जाणार असून या अभ्यास दौऱ्यामध्ये आदर्श सरपंचांना समता बांधनी व ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या संदर्भात प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदरील अभ्यास दौरा हा दिनांक २९ डिसेंबर २०२४ ते ४ जानेवारी २०२५ दरम्यान पार पडणार आहे. जालना तालुक्यातून भाटेपूरी च्या सरपंच जयश्री सतिश गावडे यांची एकमेव निवड या दौऱ्यासाठी झाली असून महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्रिपुरा अभ्यास दौऱ्यावर गेल्या असल्याने महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या सह भाटेपूरी गावातील यादवराव राऊत, बन्सीधर आटोळे, शंकर बोंद्रे, भाऊसाहेब गाढे, संजय गायकवाड, बाबा आटोळे, राजुशेठ इंदानी, पांडुरंग कावळे, रामदास भाकड, ज्ञानेश्वर भाकड, मदन भाकड, रामू चौधरी, ॲड. मारोती आटोळे, संजय आटोळे, भाऊसाहेब चोरमारे, सुंदर आटोळे, संजय गाडेकर, कैलाश आटोळे, पान २ वर



## मुलगा शेती कसू देत नाही

### विधवा आईची तहसीलदारांकडे धाव

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील हातडी येथील माझा मुलगा मला माझी शेती कसायला देत नाही म्हणून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी, ७० वर्षीय विधवा आईने एका निवेदनाद्वारे तहसीलदार परतूर यांच्याकडे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात ७० वर्षीय गयाबाई विठ्ठल गाढवे रां. हातडी ता.परतूर यांनी म्हंटले आहे की, माझे पती स्व. विठ्ठल नबाजी गाढवे यांचा मृत्यू दि. २०/०८/ २०२४ रोजी झाला असून माझे पती ह्यांची हातडी गाव शिवारात गट. क्र. १४५ मध्ये शेती आहे त्यांनी हयात असतांना माझ्या मोठ्या मुलाला त्याच्या वाट्याला येणारी शेती देलेली आहे. आता माझ्या पतीच्या नावावर हातडी गाव शिवारात गट. क्र. १४५ मध्ये जी शेती उरलेली आहे ती शेती मला माझा उदरनिर्वाह करण्यासाठी आवश्यक आहे, कारण मी कोणासोबत राहत नाही, मी वेगळी एकटी राहत आहे. मी माझ्या पतीच्या शेतात गेली असता मला माझा मोठा मुलगा उध्दव गाढवे हा शिवीगाळ करून काठी घेऊन धावून येतो, मला जीवे मारण्याच्या धमक्या देतो, मी शेती पेरण्यासाठी दुसऱ्याला दिली तर त्याला ही धमकावून शेताच्या बाहेर काढून देतो. त्यामुळे आज पर्यन्त शेतात काहीही पीक घेता आले नाही. त्यामुळे माझा उदरनिर्वाहचां प्रश्न निर्माण झाला आहे.यासंदर्भात पोलीस निरीक्षक , पोलीस स्टेशन परतुर यांना ही तक्रार अर्ज केला होता. परंतु त्यांनी कोणत्याच प्रकारे दखल घेतली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.तहसीलदार यांनी न्याय देण्याची मागणी केली आहे. उपविभागीय अधिकारी यांनाही निवेदनाची प्रत देण्यात आली आहे.



## लोकशाही दिनाचे ६ जानेवारीला आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन करण्यात येते. तरी जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय पान २ वर

## क्रिकेट खेळतांना एका खेळाडुचा मृत्यू

### ह्दयविकाराचा झटका आल्याचा अंदाज



**जालना । प्रतिनिधी -** शहरात सुरु असलेल्या एका लिग स्पर्धेत क्रिकेट खेळत असतांना एका खेळाडूचा मृत्यू झाल्याची घटना सोमवार (दि ३०) रोजी सकाळी साडे अकरा वाजेच्या दरम्यान घडली. विजय पटेल राहणार नालासोपारा मुंबई असं मृत खेळाडूचे नाव आहे. जालना शहरातील फ्रेझर बॉईज मैदानावर ख्रिसमस ट्रॉफीचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार (दि ३०) रोजी सकाळी डॉ. फ्रेजर बॉईज मैदानावर सुरु असलेल्या एका सामन्यात बल्लेबाजी करण्यासाठी विजय पटेल मैदानात उतरला होता. दरम्यान खेळत असतांना त्याने एक उत्तुंग षटकार खेचला. षटकारानंतर चेंडू मैदानावर परतेपर्यंत त्याच्या साथीदारासह काही बोलत होता. पुन्हा बल्लेबाजी करण्यासाठी क्रिझकडे जात असतांना अचानक कोसळला. हे पाहून मैदानावरील खेळाडू त्याच्याकडे धावत आले. नंतर त्यास पान २ वर

# संपादकीय पान

## बाल विवाह समस्येचे उच्चाटन व्हावे

बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल. मागील वर्षी द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत एक अहवाल प्रकाशित झाला. या अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाचा सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे. बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले आहे याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील चार वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या १२, २५३ इतकी आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुणे मुंबई सारख्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. मात्र सरकारने मंजूर केलेल्या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकलावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वानाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मंठ्यातील मनसेचे नेते-कार्यकर्ते शिवसेनेत

**मंठा । प्रतिनिधी** - तालुक्यातील जयपूर सर्कलमधील मनसेचे नेते बाळासाहेब देशमुख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वात शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी प्रवेश घेतलेल्या शेकडो कार्यकर्त्यांचा सत्कार करून पक्षात स्वागत केले.

महाराष्ट्राचे कार्यकुशल आणि धडाडीने निर्णय घेणारे मा.मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून परतुर-मंठा विधानसभा क्षेत्रातील विविध पक्षांतील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे पक्षात नव्याने येणाऱ्या कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात ओघ वाढला असून शेकडो कार्यकर्त्यांमुळे पक्षाला बळकटी मिळाल्याचे मत शिवसेनेचे तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी व्यक्त केले.

यावेळी शिवसेना पक्षाचे उपनेते आ.अर्जुन खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना मंठा तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा पार पडला यावेळी मनसे तालुका उपाध्यक्ष मंठा बाळासाहेब देशमुख यांच्या सह संतोष खवणे, महादेव मिसाळ, भगवान खंदारे,महेश वायाळ, प्रकाश राव देशमुख, नितेश देशमुख,अनंत ढाकरगे, प्रदीप टक्रास, प्रकाश मगर,बाबासाहेब दाकरगे, विशाल देशमुख, माणिक गायकवाड,लहू राठोड, दिपक देशमुख,अशोक बहिवाळ,विठ्ठल ढाकरगे, विकास देशमुख, योगेश देशमुख, पंकज देशमुख, प्रसाद देशमुख, विजय राठोड, सदाशिव ढाकरगे,




प्रदीप राठोड, लखन देशमुख, नीलकंठ देशमुख, रवि देशमुख, कृष्णा देशमुख, शिवाजीराव खवने, रमेश बापू खवणे,सुरेश खवणें, विजय वायाळ, महादेव खवणे, हनुमान देशमुख, प्रणव निर्वळ, गणेश खंदारे, विष्णुपंत देशमुख, दामू घुगे, नारायण लोमटे, विशाल ससाणे, गौतम घुगे,उत्तमराव क्रहाले,यावेळी बाळासाहेब पंडितराव देशमुख यांना उपतालुका प्रमुख मंठा पदी निवड करण्यात आली यावेळी शिवसेना तालुका प्रमुख मंठा उदय दादा बोराडे, उप तालुका प्रमुख राम वरकड, दलीत आघाडी तालुका प्रमुख दिलीप दादा हिवाळे, युवासेना तालुका प्रमुख दिपक गायकवाड, दलीत आघाडी उपजिल्हा प्रमुख नितीन मोरे, युवासेना शहर प्रमुख अँड राजेश खरात, विनोद प्रधान, सतीश वायाळ, माऊली वायाळ, पिराजी पालवे, संतोष देवकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हा काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्यावतीने माजी पंतप्रधान स्व. डॉ. मनमोहन सिंह यांना श्रद्धांजली

**जालना । प्रतिनिधी** - येथील शासकीय विश्राम गृह ४८८ अंबड रोड जालना येथे जालना जिल्हा अल्पसंख्यांक काँग्रेस विभागातर्फे माजी पंतप्रधान स्व. डॉ. मनमोहन सिंह यांना सर्व पक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. जिल्हा अध्यक्ष काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग अब्दुल रफीक अ. रशीद यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ काँग्रेस नेते किशन जेठे तथा माजी सभापती श्री. अब्दुल रऊफ भाई परसुवाले यांच्या प्रमुख उपस्थितीत, तथा विविध पक्षा व सेलचे प्रमुख व जिल्हाध्यक्ष यांच्या उपस्थितीत पूर्व दिवंगत प्रधानमंत्री स्व. मनमोहन सिंह यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली।

सदर कार्यक्रमास शेख शमशुद्दीन जिल्हा अध्यक्ष काँग्रेस कामगार सेल, आम आदमी पार्टी जिल्हा अध्यक्ष सांधीव हिवाळे, मिडीया जिल्हा प्रभारी फेरोज बागवान काँग्रेस सेवादल जिल्हा अध्यक्ष शेख इर्शाद भाई, शेख खलील भाई माजी सरचिटणीस काँग्रेस पर्यावरण विभाग, काँग्रेस नेते निज़ाम (सरकार) माजी नगरसेवक शेख शकील, युवा नेते शेख वसीम, अल्पसंख्यांक उपाध्यक्ष गफ्फार भाई कुरैशी, चंद्रकांत रत्नपारखे (कॉ. जिल्हा उपाध्यक्ष), शिव प्रकाश चितडकर (जिल्हा काँग्रेस ओ.बी.सी), अमजद खान (सामाजीक कार्यकर्ते), सदर कार्यक्रमास २०२० पर्यंत भारत सुपर पावर करिन परंतु सत्ता नसल्यास ते स्वप्न अधूरे राहिले, अल्पसंख्यांक मुस्लिम समाजासाठी सच्चर कमेटीची अहवाल मध्ये विविध योजने मंजूर केली।



आपले विचार व्यक्त करतांना श्री. राउफ भाई परसुवाले म्हणाले कि जगातील प्रसिद्ध अर्थ तज्ञ स्व. डॉ. मनमोहन सिंह यांनी देशाला कर्ज मुक्त करून अमेरीकेत आपले देशाचे नाव प्रसिद्ध केले होते,

आपले विचार व्यक्त कार्तानां अब्दुल रफीक रशीद यांनी सांगितले की, स्व. डॉ. मनमोहन सिंह यांचा सपना होता की, संजीव बहिती यांनी आपले विचार व्यक्त करताना, डॉ. मनमोहन सिंह यांनी देशाला माहिती अधिकार हा हथयार दिला तसेच त्यातून देशात ८५% भ्रष्टाचार बंद झाले म्हणून विचार व्यक्त केले।

कार्यक्रमास सर्व पक्षाचे तसेच काँग्रेस सर्व सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रमुख उपस्थिती होती।

## रस्ते अपघाचे प्रमाण करण्यासाठी एआयचा वापर; गुगलशी करार

**मुंबई** - राज्याच्या मुख्यमंत्रीपदी पदभार स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसा यांनी बैठकांचा धडाका लावला आहे. मंत्रिमंडळ विस्तारानंतर, खातेवाटप होताच संबधित खात्याच्या मंत्र्यांसमवेत देवेंद्र फडणवीस बैठक घेऊन आढावा घेत आहेत. राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्यासमवेत त्यांनी परिवहन विभागाचा आढावा घेतला. राज्यातील परिवहन क्षेत्राला राज्याला सुरक्षित, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी पुढील ३ वर्षात नवीन ई.व्ही.पॉलिसी घोषित करण्याकरण्याबरोबरच १५ वर्ष झालेली वाहने भंगारात काढावी. रस्ते अपघाताचे प्रमाण करण्यासाठी ए.आय.चा वापर करून रस्ते सुरक्षा वाढविण्यावर भर देण्यात यावा. यासंदर्भात गुगलशी करार झाला असल्याने त्याचा वापर करावा. त्याचबरोबर घाटात मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने यावर इंजिनियरिंग सोल्यूशन शोधून काढावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच्या बैठकीत दिल्या.

राज्यात परिवहन सेवेला अधिक गती देण्यासाठी राज्यात बाईक टॅक्सी, मॅक्सी कॅब सुरू करण्यावर भर देण्यात यावा. त्याचबरोबर जुन्या १३ हजार शासकीय वाहने भंगारात काढली जावी अशा सूचना करून मुख्यमंत्री म्हणाले की, टॅक्सी, टो, शहर बस सेवेचे तिकीट दरासंदर्भात निर्णय घेण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. वडसा-गडचिरोली तसेच सोलापूर-उस्मानाबाद येथील रेल्वे प्रकल्पाचे काम हाती घेण्याची सूचना केली. राज्य परिवहन सेवेच्या १५ वर्षे झालेल्या बसेस भंगारात टाकून उर्वरित बसेसमध्ये एल.एन.जी. तसेच सी.एन.जी. बसविण्यात यावी जेणेकरून बसेसची कार्यक्षमता वाढेल. बसेसच्या सुरक्षेसाठी एस.ओ.पी. निश्चित करण्याच्याही सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी केल्या.

# जुनं नव्यात केवळ भावनिक समाधानाचा मेळ

जस जस दिवसाचं एक एक पान उलटत जातं आणि शेवटच्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत येऊन ठेपतं तस तस सरत्या वर्षाचा निरोप घेण्याची वेळ येते. कुणाचाही निरोप घेताना मन संमिश्र भावनांनी भरलेलं असतं. अगदी तसंच सरत्या वर्षाचा निरोप घेतानाही मन गलबलून येतं. या वर्षात काय काय केलं, काय चुकलं, काय शिकलो, काय अपूर्ण राहिलं किंवा काय समाधान देऊन गेलं याचा ताळेबंद मनात चालूच असतं.

निरोप घेणं इतकं सोपं नसतं, मग ते कुणाचंही असो...असं असलं तरी सरत्या वर्षाला निरोप देणं गरजेचं असतं. कारण या वर्षाने आपल्याला अनेक आठवणी, आनंद आणि बरच काही दिलेलं असतं. या सर्व आठवणींची शिदोरी घेऊन नव्या वर्षात पदार्पण करायचं असतं. मागे वळून पाहताना जाणा-या वर्षाला निरोप देताना मनात संमिश्र भावनांचा कल्लोळ असतो. तयारी वर्षा अखेरची सरत्या वर्षाला निरोप देताना कुणी सहकुटुंब, मित्र परिवार वा नातेवाईक यांच्या बरोबर वेगवेगळ्या ठिकाणी एकत्र येतात. कुणी पार्ट्यात मदमस्त होतात, तर कुणी इतर कार्यक्रम ठेवतात. पण हेतू मात्र एकच असतो.

खरं तर आपलं नवीन वर्ष गुढीपाडव्याला सुरू होतं. आपले सण-उत्सव हे ऋतुमानाप्रमाणे आपण साजरे करतो. गुढीपाडव्याला झाडांची जुनी पालवी गळून नवीन पालवी फुटते. सर्वसृष्टी नवचैतन्याने बहरून जाते. त्यावेळेला माणसाच्या मनामध्ये निसर्गाकडे पाहताना आनंदाचा बहर येतो. आजकाल हे आपण विसरत चाललो आहोत आणि १ जानेवारीपासून आपण नवीन वर्ष साजरे करू लागलो आहोत.

सरत्या वर्षाला जेव्हा आपण निरोप देतो, तेव्हा मनामध्ये नवीन आशा-आकांक्षा जन्म घेतात. नव्या उमेदीने त्या साकार करण्याची इच्छा मनात जागृत होते. ज्या वेळेला जुन्या वर्षात घडलेल्या अप्रिय घटना विसरून आपण नवीन वर्षात पदार्पण करतो, त्या वेळेला नवीन सकारात्मक ऊर्जा आपल्या सुप्त मनात कार्य करू लागते.

पण नववर्ष साजरे करण्याची परंपरा हजारो वर्ष जुनी आहे. १५३ ईसापूर्व रोममध्ये याची सुरुवात झाली. तेव्हा लोक १ मार्चला नवीन वर्ष साजरे करायचे. ४६ बीसी मध्ये ज्युलियस सीझरच्या सौर-आधारित कॅलेंडरमध्ये १ जानेवारी रोजी साजरा केला जाऊ लागला. रोमन साम्राज्यात ही प्रथा मोठ्या प्रमाणावर स्वीकारली गेली. १५८२ मध्ये ग्रेगोरियन कॅलेंडर लागू झाल्यानंतर १ जानेवारी हा नवीन वर्षाचा प्रारंभ म्हणून साजरा केला गेला. नवीन वर्षाचा उत्सव प्रथम किरिबाटीमध्ये साजरा करण्यात आला आणि आता हा उत्सव हळूहळू पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकू लागला.

दरवर्षी ३१ डिसेंबरच्या रात्री लोकं जुन्या वर्षाला निरोप देतात आणि रात्री १२ वाजता अनेक आशा आणि स्वप्नांसह मोकळ्या हातांनी नवीन वर्षाचं स्वागत करतात. प्रत्येक सरतं वर्ष जातांना आपल्याला भरपूर काही शिकवून जातं आणि नवीन वर्ष येतांना आपण त्या शिकवणीतूनच नवीन संकल्प घेऊन नवीन स्वप्नांची शिदोरी बांधत असतो.

खरं तर येणारे नवीन वर्ष आपल्यासोबत नवीन आनंद, नवीन स्वप्न आणि भरपूर उत्साह घेऊन येत असतं. त्यामुळे जगभरातील लोक नवीन वर्षाचं वेग-वेगळ्या हटके पद्धतीने स्वागत करताना दिसतात. आता सरतं वर्ष हे मावळतीला चाललं आहे आणि नवं वर्ष उंबरठ्यावर आहे. मागील वर्षाचे हिशेब मागे राहिले आहेत, त्याची जागा नवीन वर्षाच्या संकल्पांनी घेतली जाणार आहे.

नववर्षाच्या पूर्वसंध्येला जवळजवळ प्रत्येकच घरातले दिवे मध्यरात्रीपर्यंत सुरू असते. त्यामुळे देश रात्रीसुध्दा जागा असतो असं म्हणायला हरकत नाही. सरत्या वर्षाला निरोप देत असताना कटू-गोड आठवणींची सोबत असते. हे वर्ष खूप काही देऊन आणि शिकवून जाते. त्यामुळे हे सरतं वर्ष अनेक प्रकारे प्रेरणादायी आणि आश्चर्यकारक ठरते. याच आश्चर्यामुळे सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केल्या जातं. हा सोहळा जेवढा नेत्रदीपक असतो, तेवढाच मनाला सुखावणारा आणि नवी उमेद देणारा ठरतो. सरतेशेवटी एवढंच म्हणावंस वाटते.

**सरत्या वर्षाला निरोप देऊ**
**जीवनगाणे नव्याने गाऊ**

सुनील शिरपुरे,
कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

पान १ वरुन

### व्यापाऱ्यास लुटणारे ...

संदीप भारती, एम.आय.डी.सी. वाळुज पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर पोनि, कृष्णा शिंदे, पोउपनि शैलेश महस्के, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, रामप्रसाद पन्हरे, प्रभाकर वाध, रमेश राठोड, गोपाल गोशिक, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर, ईरशाद पटेल, सतिष श्रीवास, रमेश काळे, योगेश सहाने, सौरभ मुळे सर्व स्था.गु.शा. जालना व सदर बाजार पोलीस ठाण्याचे रामप्रसाद रंगे, धनंजय कावळे, जगन्नाथ जाधव, नजीर पटेल, अजिम शेख, राहुल कटकम, दुर्गेश गोफणे, गणेश तेजनकर, तसेच एम.आय.डी.सी. वाळूज पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर पोउपनि विलास वैष्णव, पोलीस अंमलदार बाबासाहेब काकडे, सुरेश भिसे, रोहित चिघळे यांनी केली आहे.

### जिल्हा युवा ...

पुर्ण व ३१ मार्च २020 रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. वर्ष २020-२१ च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २०१९ रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२१ रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. वर्ष २०२१-२२ च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २020 रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२२ रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. वर्ष २०२२-२३ च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. 0१ एप्रिल २०२१ रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२३ रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. सन २०२३-२४ च्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी दि. १ एप्रिल २०२२ रोजी १३ वर्षे पुर्ण व ३१ मार्च २०२४ रोजी ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असावे. जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक, युवतींनी व नोंदणीकृत संस्थांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथून अथवा ़.ारहरीरिहींीर.सेीं.ळप या संकेतस्थळावरून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. १२ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयासोबत जोडलेला अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथे संपर्क साधावा. असे जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी कळविले आहे.

### सरपंच जयश्री गावडे ...

महादेव आटोळे, संदीप गाढे, पोलीस पाटिल तुकाराम गाडेकर, विठ्ठल आटोळे, अर्जुन घोंगडे, भगवान कावळे, कैलाश म्हस्के, शेसेराव गाढे, विजय सुराशे, संतोष गावडे, कैलास लोखंडे, अर्जुन गोरे, कृष्णा गाढे, अशोक राऊत, माऊली कचरे, पांडुरंग मोरे, दत्ता कदम, दिपक लोखंडे, बालाजी बोंद्रे, लहू कचरे यांनी अभिनंदन करून ग्रामीण विकासाच्या दृष्टीने असलेल्या संबंधित अभ्यास दौऱ्याकरिता शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

### लोकाशाही दिनाचे ...

लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना हींींि://क्षरश्रपर.पळल.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

### क्रिकेट खेळतांना ...

मैदानाबाहेर नेण्यात आले. मात्र, त्याचा त्या ठिकाणी मृत्यू झाला. मृत्यूचे कारण स्पष्ट नसले तरी हृदयविकाराच्या झटका आल्याने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# मुलीवर अत्याचार करुन पलायन करण्याच्या तयारीत असलेल्या नराधमाच्या पोलीसांनी आवळल्या मुसक्या

## कदिम जालना पोलिसांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात अल्पवयीन मुलीवर परप्रांतीय नराधम ाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आलीय. या घटनेनंतर पलायन करण्याच्या तयारीत असलेल्या नराधमाच्या कदिम जालना पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. फैजान खान (रा. उत्तर प्रदेश) असं ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचं नावं आहे.

जालना शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील सोनलनगर येथे अमजद खान यांची इमारत बांधकाम साईड सुरू आहे. या बांधकामाच्या ठिकाणी परतूर तालुक्यातील एक व्यक्ती वॉचमन म्हणून काम करीत असून, त्याठिकाणी तो व्यक्ती आपल्या कुटुंबासह राहत आहे. या इमारतीमध्ये उत्तर प्रदेशातील कामगारांकडून फरशी बसविण्याचे काम सुरू आहे. चार-पाच दिवसांपूर्वी वॉचमनची १४ वर्षीय मुलगी इम ारतीच्या वरच्या मजल्यावर कपडे वाळू घालण्यासाठी गेली असतांना फरशी बसविण्याचे काम करणाऱ्या फैजान खान याने चिमुकलीचा हात धरून बळजबरीने खालच्या मजल्यावर असलेल्या बाथरूम मध्ये तिच्यावर अत्याचार केला होता. मात्र, बदनामी होऊ नये म्हणून मुलीच्या कुटुंबाने याबाबत कुठेही वाच्यता केली नव्हती.




दरम्यान रविवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास सदर मुलगी पुन्हा इमारतीच्या वरच्या म जल्यावर कपडे वाळू घालण्यासाठी गेली असता, पुन्हा फैजान खान याने तिचा हात पकडून बाथरूमकडे नेण्याचा प्रयत्न केला. यावेळी मुलीने प्रतिकार करून आरडाओरडा करताच आरोपी घटनास्थळावरून पळून गेला होता. याप्रकरणी सदर मुलीच्या नातेवाईकांनी कदीम जालना पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, सहायक पोलीस निरीक्षक अमित म्हस्के, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव नागरे आदींनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

दिनांक-२९ रविवार रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास कदीम जालना पोलीस ठाण्यात मुलीच्या फिर्यादीवरून बलात्कार, विनयभंगाच्या गुन्ह्याबरोबरच ट्रॉसिटी कायदा आणि पोस्को कायद्यानुसार कलम-६५ (१),७५,३५१(२) (३) इछ्ड२०२३ सह कलम ४,६,८,१२ पोक्सो सह कलम ३(२)(त), ३(१)(थ)(ळ) (खख), ३(२) (त) अ.जा. ज.अ.प्र.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून आरोपी फैजान खान हा उत्तर प्रदेशला पळून जाण्याच्या प्रयत्नात असतांना त्याला रेल्वे स्टेशन परिसरातून पोलिसांनी ताब्यात घेतलय. या प्रकरणी कदीम जालना पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# विभागीय स्पर्धेमध्ये मंठाच्या स्वामी विवेकानंद महाविद्यालय संघाने सुवर्णपदक पटकावले




**मंठा । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे क्रीडा परिषद क्रीडा कार्यालय आष्टी तालुका जिल्हा बीड येथे झालेल्या विभागीय शालेय डॉजबॉल स्पर्धा १९ वर्षा खालील मुली स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय मंठाच्या संघाने विभागीय स्पर्धेम ध्ये सुवर्णपथक पटकावले आहे पुढील स्पर्धा यवतमाळ येथे होणाऱ्या राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेसाठी मुलीचा संघ पात्र ठरला आहे..

संस्थेचे सचिव कपिल भैया आकात , उपाध्यक्ष कुणाल भैया आकात , प्राचार्य माणिकराव थिटे , उपप्राचार्य सुधाकर जाधव, उपप्राचार्य सदाशिव कमळकर,उपप्राचार्य संभाजी तिडके , प्राध्यापक एकनाथ आघाव. प्रा टी एम खरात , संदेश राठोड , प्राध्यापक पंढरीनाथ काकडे, प्राध्यापक श्रीकांत खेडेकर, यांनी संघाचे अभिनंदन केले आहे

या स्पर्धेसाठी क्रीडा प्रशिक्षक प्रा रमेश शिंदे , व अक्षय ढेंगळे, कुणाल राठोड, रविराज आडे यांनी संघासाठी परिश्रम घेतले.

# शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मृती व्यंगचित्रकला स्पर्धा !

**ठाणे । प्रतिनिधी -** स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मृती व्यंगचित्रकला स्पर्धा २०२५ साठी व्यंगचित्रांच्या माध्यमातून सम ाज प्रबोधन या विषयावरील व्यंगचित्र पाठवण्याचे आवाहन शिवसेवा मित्र मंडळ, ठाणे पूर्व या सामाजिक संस्थेच्या वतीने स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती प्रित्यर्थ व्यंगचित्रकला स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेचं हे १२ वे वर्ष असून, या व्यंगचित्रकला स्पर्धे साठी १) बालव्यंगचित्रकार (वय वर्ष १५ खालील) २) दिव्यांग स्पर्धकांसाठी विशेष गट ३)हौशी व्यंगचित्रकार - खुला गट (वय वर्ष १६ वरील) ४) स्पर्धेतील उत्कृष्ट सहभागासाठी पहिल्या तीन शाळांसाठी विशेष सन्म ानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल. सर्व स्पर्धकांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून सम ाज प्रबोधन या विषयावरील आपली व्यंगचित्र, अे ३ साईझ ( ४२ द ३० सेंमी ) पेपर म ध्ये, तसेच व्यंगचित्राच्या मागे आपले संपूर्ण नाव, पत्ता, जन्म तारीख/वय, स्पर्धक गट, मोबाईल नंबर, त्याचप्रमाणे बालव्यंगचित्रकारांनी आपल्या शाळेचं नाव, ईयत्ता लिहून, धर्मवीर आनंद दिघे चौक , मंगला हिंदी शाळेसमोर, कोपरी, ठाणे पूर्व ४००६०३ येथे दिनांक १६ जानेवारी २०२५ ते दि. २० जानेवारी २०२५ च्या दरम्यान सायंकाळी ७ ते ९ या वेळेत पोहचतील अशी व्यवस्था करावयाची आहे.

परीक्षकांनी निवडलेल्या निवडक व्यंगचित्रांचे प्रदर्शन गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते रात्री १० पर्यंत आयोजित केले जाणार आहे आणि गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते सायंकाळी ७.०० वाजता ठाणे महापालिका, खुले कलादालन, अष्टविनायक चौक, मिठ बंदर रोड, ठाणे पूर्व येथे आयोजित करण्यात येईल.

१)परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल. २) व्यंगचित्राच्या पुढील भागात स्पर्धकाचे नाव लिहिलेली व्यंगचित्र स्पर्धेसाठी पात्र नसतील. ३) राजकीय नेत्यांची किंवा राजकीय किंवा जातीय सलोखा बिघडवणाऱ्या विषयांवरील व्यंगचित्र स्पर्धे साठी आणि प्रदर्शनासाठी पात्र नसतील ४) एकदा पाठवलेली व्यंगचित्र ही पुन्हा परत मि ळणार नाहीत ५) स्पर्धकांची व्यंगचित्र त्यांनी स्वखर्चाने आणि स्वतःच्या जबाबदारीवर पाठवलेल्या स्पीड पोस्ट अथवा कुरियर मार्फतही दिनांक २० जानेवारी २०२५ पर्यंतच स्वीकारली जातील, त्यासाठी ९८३३१५८८०० या भ्रमणध्वनी वर संपर्क साधावा. ६) ऋही व्यंगचित्रकला स्पर्धा सर्व नागरिकांसाठी खुली आहे. ७) स्पर्धेच्या नियमांत आयत्यावेळी बदल करण्याचे सर्व अधिकार हे शिवसेवा मित्र मंडळ. ठाणे पूर्व कडे राखीव असतील. अधिक माहितीसाठी संपर्क ९२२४१९९९७९ / ९७६८६८८२९७ / ९८६९४१३९११ / ९८३३१५८८०० या क्रम ांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मराठबोली संस्थेतर्फे पुण्यामध्ये शब्द शंकरपाळी दिवाळी अंक २०२४ पुरस्काराने सन्मानित

**मुंबई । प्रतिनिधी -** मराठी साहित्य क्षेत्रात दरवर्षी दिवाळीच्या मुहूर्तावर शेकडो ते हजारो दिवाळी अंक प्रकाशित होतात आणि त्यांचे लोकार्पण केले जाते. शब्द शंकरपाळी दिवाळी अंक यास आतापर्यंत राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत पारितोषिके मिळालेली आहेत आणि साहित्य क्षेत्रात एकमेव ओळख निर्माण करून वेगळा ठसा उमटविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. काही वर्षी हा दिवाळी अंक पुस्तक स्वरूपात करण्यात आला. तर, काही वर्षी हा दिवाळी अंक ऑनलाइन स्वरूपात प्रकाशित करण्यात आला. प्रत्येक वर्षी अंक प्रकाशित करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. तरीही सर्व अडचणींवर मात करून शेवटी समूहाने यशस्वीरित्या दिवाळी अंक प्रकाशित केला.

२०२४ या वर्षात महाराष्ट्र राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत अनेक दिवाळी अंकांनी स्पर्धांचे प्रतिनिधित्व केले होते. त्यामध्ये मराठबोली पुणे या संस्थेतर्फे शब्द शंकरपाळी दिवाळी अंकास तृतीय क्रमांकाचे पारितोषक देऊन गौरविण्यात आले आणि विशेष कौतुक म्हणून खास गौरवउदगार करण्यात आले. या कार्यक्रमास भूषण तांबे, मृगनयना भजगवरे, शलाका कोठावदे, प्रदीप बडदे, शितल मदने, राजपूत काशीबाई, सारिका सरकाळे, मिरा खंडागळे, रसिका तुपे, शिवाजी जाधव, सारंग सबनीस, वृषाली कुलकर्णी, हेमलता निगडे इत्यादी साहित्यिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली.



अलीकडेच गेल्या आठवड्यात याच अंकास साताऱ्यातून स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. दोन्ही ठिकाणी पारितोषिक म्हणून सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

शब्द शंकरपाळी दिवाळी अंकाच्या आजवरच्या साहित्यिक प्रवासात सातत्याने दिवाळी अंक प्रकाशित होत आहे आणि त्याचे विशेष कौतुक करून त्यास सन्मान देण्यात येत आहे. मराठी साहित्य क्षेत्रात तसेच विविध स्तरांवर शब्द शंकरपाळी काव्यप्रकाराचे तसेच दिवाळी अंकाचे विशेष कौतुक करून पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**

# लॉटरी बंदीला विरोध विक्रेते रस्त्यावर!

## शासनाच्या कल्याणकारी योजनेची थट्टा उडविणारा बंदीचा विचार



**मुंबई । प्रतिनिधी -** लाखो विक्रेत्यांचा रोजगार हिसकावून घेणारा महाराष्ट्र राज्य लॉटरी बंदीचा निर्णय असून तो लागु झाल्यास शासनाच्या कल्याणकारी योजनांची थट्टा उडविणारा ठरेल' असे लॉटरी विक्रेत्यांचे जेष्ठ नेते श्री विलास सातार्डेकर यांनी सांगितले. शिवसेना पक्षप्रमुख श्री उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन विक्रेत्यांच्या एका शिष्टमंडळाने मंत्रालयाच्या दिशेने कुच केली त्यावेळी सातार्डेकर बोलत होते.

महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्याचे जे प्रशासकीय षडयंत्र सुरू आहे त्याला जोरदार विरोध करण्याच्या अपेक्षेने शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धव ठाकरे यांच्याकडे मातोश्री निवासस्थानी लॉटरी विक्रेत्यांचे नेते श्री विलास सातार्डेकर यांच्या नेतृत्वाखाली विक्रेत्यांचे शिष्टमंडळ पोहोचले त्याने सरकारच्या कट कारस्थानाचा यावेळी पर्दाफाश केला आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरी संघटनेने नुकतीच मातोश्री'वर उद्धवजी ठाकरे आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या अजिंक्यतारा' निवासस्थानी भेट घेऊन महाराष्ट्र राज्य लॉटरी बंदीच्या एकूणच हालचालींची माहिती नेत्यांना दिली. शिवसेना नेते विनायक राऊत यांनी ही लॉटरीच्या सद्यस्थिती बद्दल एक निवेदन स्वीकारले.विरोधकांनी

सरकारला जाब विचारून विक्रेत्यांची रोजीरोटी सुरक्षित ठेवावी! अशीही अपेक्षा सातार्डेकर यांनी यावेळी केली. १९९७/९८ या वर्षी राज्य शासनाने अशाच प्रकारे लॉटरीबंदीचा निर्णय तडकाफडकी घेतला होता तेव्हा हे प्रकरण न्यायालयापर्यत पोहोचले

त्यावेळी हिंदु हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रम ुख श्री बाळासाहेब ठाकरे यांनी या बंदीला कडकडून विरोध केला होता राज्य शासनाला मिळणाऱ्या म हसुलीपेक्षा विक्रेत्यां च्या रोजीरोटीचा प्रश्न हा अधिक महत्त्वाचा आहे.

बेकार, अपंग, विधवा, अंध, वयोवृद्ध, अबला यांचा सहभाग विक्रेते म्हणुन असल्याने 'लॉटरी बंदीचा निर्णय घेतल्यास स्वतः रस्त्यावर उतरीन! असाही आक्रमक पावित्रा शिवसेना प्रमुखांनी घेतला होता. त्याची आठवण सातार्डेकर यांनी यावेळी नेत्यांना करून दिली.

या संदर्भात अधिक चौकशी करून उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून लॉटरी विक्रेत्यांच्या भावना मांडता येतील, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले. लॉटरी विक्रेत्यांच्या शिष्टमंडळात संघटनेचे सरचिटणीस राजेश बोरकर, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, भावेश पवार, अनिल सावंत, उषा कंटागले, दीपाली शर्मा, आशिष गुरव ईत्यादींचा समावेश होता.

# केंद्रीय युवा महोत्सवात जेईएस लोककला विभागाचे यश

जालना । प्रतिनिधी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केंद्रीय युवा महोत्सवात जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभागाला यश मिळाले असून विभागाच्या भारूड या कला प्रकारासाठी दूसरा तर लोकगीतासाठी तृतीय क्रमांक मिळाला आहे.

दिनांक २५ ते २८ डिसेंबर दरम्यान विद्यापीठ परिसरात आयोजित या महोत्सवात २९३ महाविद्यालयाच्या संघांनी सहभाग घेतला. लोककला प्रकारात जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'संसार नगरी बाजार भरला' या भारूडास प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला . या भारुडासाठी संघास व्दितीय क्रमांक मिळाला तर 'गुलाल खोबरा ज्योतिबाच्या दाराला' या रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. या लोकगीताने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

या शिवाय लोककला, प्रहसन, चित्रकला, प्रश्नमंजुषा, काव्यवाचन आणि वक्तृत्व या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

या संघामध्ये आनंद घुले, आदित्य मुदिराज, शोहेब शेख, अदित्य गोमटे, ओम गायकवाड, नेहा अलकोंडा, ओम साळवे, प्रतीक्षा निकम, तेजस्वीनी पाठक, साचल बिहानी, सलोनी एक्कलदेव हे विदयार्थी सहभागी होते. या विद्यार्थी कलावंतांना लोककला विभागाचे प्रमुख प्रा. कल्याण उगले यांचे मार्गदर्शन लाभले. संघ प्रमुख म्हणून प्रा. म नोज महेर आणि प्रा.अमृता सूलाखे यांची साथसंगत मि ळाली. हे पारितोषिक सुप्रसिद्ध हास्य अभिनेते समीर चौगुले, शाम राजपूत व कुलगुरू प्रा.




डॉ. विजय फुलारी आणि मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री , उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, डॉ. यशवंत धावणे यांनी काम पहिले. तर सादरीकरणासाठी शाहीर कल्याण उगले, विशाल, हरेश उगले, कुणाल पवार, ओंकार सोनुने, प्रा. कल्याण उगले , प्रा. मनोज महेर आणि डॉ. हेमंत वर्मा यांनी अभिनंदन केले आहे.

# जालना येथे भव्य मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर; १९ जानेवारीला प्राथमिक तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी क्लब ऑफ जालना आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने जालन्यात २२ फेब्रुवारी रोजी म ोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर आयोजित करण्यात आले असून, त्या अनुषंगाने प्राथमिक तपासणी रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ रोजी करण्यात येणार आहे. गेल्या १९ वर्षापासून जालना जालना येथील मिशन हॉस्पिटलमध्ये प्लास्टिक सर्जरी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यावर्षीही मुंबईतील नामांकित प्लास्टिक सर्जन डॉ. अनिल टिबरेवाल आणि त्यांचे सहकारी तज्ज्ञ सर्जन या शिबिरात सेवा देतील. फाटलेले ओठ, तोंड आणि चेहऱ्याची विकृती विकृती,जळाल्यामुळे हात व पायाला झालेली इजा, चिकटलेली बोटे, जळीत जखमा, अन्य जन्मजात विकृती असलेल्यांवर मोफत प्लास्टिक शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या शिबिराचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांसाठी प्राथमिक तपासणी रविवार, दि. १९ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता मिशन हॉस्पिटल, जालना येथे होईल. शिबिराची अधिक माहिती आणि नावनोंदणीसाठी मिशन हॉस्पिटलचे डॉ. ख्रीस्टोफर मोजेस, रोटरी क्लब जालनाचे



अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया (९८२३०८३९०२), सचिव रवी भक्कड (९०२८९५१७३१), प्रकल्पप्रम ुख अभय नानावटी (८६६८२ ६७०४७), प्रकल्प सहाय्यक डेव्हिड गायकवाड (९६०४९२६९७७), यांच्याशी संपर्क साधावा आणि या शिबिराचा गरजूंनी मोठ्या संख्येने लाभ घेण्यासाठी प्राथमिक तपासणी करून घ्यावी, असे आवाहन रोटरी क्लब जालना, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन आणि मिशन हॉस्पिटलच्यावतीने करण्यात आले आहे.

## धारावी मॅरेथॉन स्पर्धेला विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट प्रतिसाद!



**धारावी । प्रतिनिधी -** येथे धारावी गोल्डन कंपाऊंड ते टी जंक्शन, छोटा सायन हॉस्पिटल, कुंभारवाडा सिग्नल ९० फूट मार्गे, साहिल हॉटेल, गोल्डफिल्ड कंपाऊंड अशा प्रकारे तीन ते पाच किलोमीटरचा अंतर पार केलेल्या शालेय विद्यार्थी व सहभागी स्थानिक लोकांना एकता सोशल वेल्फर सोसायटीतर्फे प्रमाणपत्र व मेडल देऊन प्रोत्सानात्मक पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांसह यात सहभागी झालेल्या धारावीकरांना सन्मानित करण्यात आले. यंदाचे हे सहावे वर्षे होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष मुर्गेश मुतु, सामाजिक कार्यकर्ते दिलीप गाडेकर, अशोक चौगुले, गिरीराज शेरखाने, गणेशन मुतू, सतीश हटकर नैले नायगम उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी रमाकांत गुप्ता, मुतू पठण, आमदार कॅप्टन सेल्वम ,अशोक वडविल, जेपीआर, पाकीजा नाथा तसेच जैन सेवा संघ यांचे सहकार्य लाभले. धारावी पोलीस ठाणे व वाहतूक विभाग धारावी कुर्ला यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमामधील सहभागी विद्यार्थी व धारावीकरांना कार्यक्रम स्थळी चहा नाश्ता अल्पहार म्हणून देण्यात आला अशी माहिती संयोजक अशोक चौगुले व श्री गणेशन मुतू यांनी दिली.

## आमदार अर्जुन खोतकर यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर संपन्न

जालना । प्रतिनिधी - जालना विधानसभा मतदार संघाचे आमदार अर्जुन खोतकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रभाग २२ व २३ महायुती मित्र मंडळ व ओझेस मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

या शिबिराचे उद्घाटन आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते झाले.तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार अरविंद चव्हाण. प्रमुख पाहुणे म्हणून राजेश राऊत. ब्रह्मानंद चव्हाण. विष्णू पाचफुले, पंडित भुतेकर, अनिरुद्ध खोतकर, सौ शकुंतला कदम, सौ संध्या संजय देठे, मिर्झां अनवर बेग, दिनेश भगत, शुभम टेकाळे, अरिहंत मेका, महिंद्र मंचेवार, राजकुमार गुंटुक, बालाजी अडियल, गणेश जल्लेवार, रमेश मुळे, ॲड. राहुल हिवराळे होते.

ओजस हॉस्पिटलचे डॉ. श्रीमंत लाखे, डॉ. सुरजसिंह तौर व त्यांची संपूर्ण टीम यांनी तपासणी केली.

याप्रसंगी आमदार अर्जुनराव खोतकर, शकुंतला कदम, राजेश राऊत, सौ संध्या देठे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

आमदार अर्जुन खोतकर यांनी आपले अध्यक्षीय भाषणात जालना विधानसभा मतदारसंघात गरजू गोरगरिबांसाठी आरोग्याची सेवा आणखीन बळकटीकरण करून आरोग्य सेवेकडे प्रथमतः सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल असे सांगितले.

महिलांनी कुठल्याही संकोच न बाळगता आपल्या सर्व समस्या डॉक्टरांना सांगून त्याचे निदान करण्याचे आवाहन आमदार अर्जुन खोतकर यांनी केले. या शिबिरात जवळपास पाचशे महिलांनी पुरुषांनी आपली



तपासणी करून घेतली.

महेंद्र मंचवार यांनी तयार केलेल्या नवीन वर्षाच्या कालदर्शिकेचे विमोचन आमदार अर्जुन खोतकर व मान्यवराच्या हस्ते करण्यात आले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी आर्यन मेका, महिंद्र मंचेवार, मोहन मंचेवार, बालाजी अडियाल, निलेश वानखेडे, यश ठाकूर, सागर ठाकूर, शंकर मोहिते, पृथ्वीराज शुभम टेकाळे, बालाजी टेकाळे, अरुण पवार, राजकुमार गुजर, अभिषेक गुंजकर, आकाश लाखापती, भगवानचे पाच श्रीविनाश मंचेवार, गणेश गुड्डा, मनोज देवरे, सागर गुंटूर, किशोर शिंदे, राजू पेदराम, दासार, महेश पंचवार, कन्नू गंगुल, गणेश वालाकट्टी, सागर मेका आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ संध्या संजय देठे यांनी केले तर सूत्रसंचालन आभार शुभम टेकाळे यांनी मानले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.